शुक्रवार, १ एप्रिल २०२२

तरुण भारत

# हळबे कॉलेजच्या श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

वार्ताहर
दोडामार्ग



शिरंगे : हळबे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या निवासी श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी सुहास परब यांचे स्वागत करताना प्रा. डॉ. सुभाष सावंत सोबत अन्य.

जीवनात कोणतेही काम हे कनिष्ठ नसते. कोणतेही काम मनापासून केल्याने त्यात यशस्वी होता येते. श्रमाचे संस्कार करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये रुजले जातात. भविष्यात यशस्वी होण्यासाठी सकारात्मक प्रेरणांची शिदोरी असेल तरच सर्वांगीण विकास होतो. त्याशिवाय ते शक्य नाही, असे विचार ए. टी. एस. (दहशतवादी विरोधी पथक) ब्रांच गोवा व हळबे महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी सुहास परब यांनी व्यक्त केले.

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सात दिवसीय निवासी श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून परब बोलत होते. हे शिबीर शिरंगे पुनर्वसन येथे आयोजित केले होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत होते. यावेळी व्यासपीठावर शिरंगे गावच्या सरपंच सरस्वती नाईक, शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत नाईक, शालेय समिती अध्यक्ष सुहानी गवस, हळबे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. एस. यू. दरेकर, डॉ. सोपान जाधव, कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप बर्वे, डॉ. राजेंद्र इंगळे उपस्थित होते.

### शिबिरात राबविले विविध उपक्रम

दरम्यान, कृषी विकासातून ग्रामीण विकास ही मध्यवर्ती कल्पना समोर ठेवून सात दिवसीय शिबिरादरम्यान गावातील रस्ते स्वच्छता, प्लास्टिक कचरा व सार्वजनिक विहिरींची स्वच्छता, शाळा ग्रामपंचायत कार्यालय, हॉस्पिटल परिसर स्वच्छता आदी कामे करण्यात आली. प्रसिद्ध रंगकर्मी शरद सावंत, वनस्पती अभ्यासक सूर्यकांत गावकर, कृषी पर्यवेक्षक एस. ए. सद्गुरू, कृषी विद्यालयचे माजी प्राचार्य चंद्रशेखर सावंत व पर्यावरण तज्ञ राजेंद्र केरकर (गोवा) आदींची व्याख्याने झाली. सूत्रसंचालन अनिषा धर्णे हिने तर आभार डॉ. राजेंद्र इंगळे यांनी मानले.